*मला प्रॉब्लेम लक्षात येतो. खलनायकाच्या खलप्रवृत्तीशी अजून तिचा परिचयच झालेला नाही. तिच्या खेळण्यातल्या लॅपटॉपमध्ये एक लायन आहे, पण तो नुसताच मजेत डरकाळी फोडून मान हलवतो आणि ते बघून ती खदाखदा हसते. त्यामुळं लायन भीतीदायक असू शकतो हे तिच्या गावीच नाही. पण मी सिंहाची व्यक्तिरेखा (की प्राणिरेखा?) श्रोत्याला पटेल अशी रंगवण्याच्या भानगडीत वगैरे न पडता अनेक हिंदी चित्रपटाच्या कथालेखकांना स्मरून कथा तशीच पुढं रेटतो.*

झोपताना बाप मुलीला गोष्ट सांगायला लागतो. ती गोष्ट काही अपेक्षित आणि काही अनपेक्षित वळणं घेत कशी संपते, याची गोष्ट.